N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** अमळनेर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0041 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/01/2019 05:13 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार

**Date From (दिनांक पासून):** 19/01/2019
**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/01/2019
**Time Period (कालावधी):** पहर 7
**Time From (वेळेपासून):** 21:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:40 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/01/2019 **Time (वेळ):** 03:46 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/01/2019 03:46 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्तळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 4 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** अमळनेर शहरातील गणेश, कॉलनी धनलक्ष्मी प्लाझा,येथील दुकान नं 2 येथे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** गोपाळ महादु ठाकुर
**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
**(c) Date/Year of Birth (जन्म** 1969 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव,अमळनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव,अमळनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सोमचंद छगन संदानशिव | | | 1. गांधलीपुरा अमळनेर,अमळनेर,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | मनोज साहेबराव निंकुभ | | | 1. गुरुकपा कॉलनी अमळनेर ,ता अमळनेर ,अमळनेर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 12,000/ रुपये त्यात 2000/ रु दराच्या 02 नोटा व 500 / रुपये दराच्या 16 नोटा अ.पा. लावलेल्या | 12,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 12,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

सरकारतर्फे फिर्याद लिहुन देतो की, मी अँ○टी करप्शन ब्युरो जळगांव येथे सप्टेबर 2017 पासुन पोलीस उपअधिक्षक म्हणुन कार्यरत आहे. मी दि. 19/01/2019 रोजी कार्यालयात हजर असतांना तक्रारदार श्री संतोष वासुदेव चौधरी वय 47 वर्षे धंदा व्यवसाय हात मजुरी रा पाटील कॉलनी अमळनेर ता अमळनेर जि जळगांव यांनी दोन सरकारी नोकरा विरुध्द लाचेच्या मागणी संबधात फोनद्वारे तक्रार दिली व दि. 19/01/2019रोजी तक्रारदार सदर बाबत सदर सरकारी नोकरांशी बोलणी करण्यास जाणार असल्याबाबत देखिल तक्रारदार यांनी कळविले, त्यानुसार आम्ही दि. 19/01/2019 रोजी पत्र व्यवहार करुन सरकारी नोकर पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले त्यानुसार सदर दोन्ही पंच हे सकाळी 10.00 वाजता अँ○टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात हजर झाले .त्यानंतर पंचाना वरील तक्रारी बाबत माहीती देवुन तक्रारदार श्री संतोष चौधरी हे अमळनेर येथील प्रताप मिल जवळील मोकळ्या मैदानात भेटणार असल्याचे ही सांगितले त्यानुसार खाजगी तवेरा काळ्यारंगाची क्रमांक MH-12 AH 9300 मधुन चालक श्री रविंद्र पाटील सोबत आम्ही स्वता दोन्ही पंच व सापळा पथक असे वर नमुद ठिकाणी गेलो असता तेथे तक्रारदार श्री संतोष चौधरी भेटले . त्यांना सोबत असलेल्या तवेरा मध्ये बसविले व त्यांना त्यांची तक्रार तोंडी कथन करण्यास सांगुन दोन्ही पंचाना ऐकण्यास सांगितली व आम्ही सुध्दा ऐकली . त्यानंतर तक्रारदार यांची तक्रार खाजगी वाहनात सोबत आणलेल्या लॅपटॉप संगणकावर टंकलिखित करुन घेतली व सदर वाहनात असलेल्या बॅटरीच्या सॉकेटवर सदर तक्रारीची प्रिन्ट काढुन घेतली त्यानंतर सदर तक्रारीवर तक्रारदार व आम्ही सह्या केल्या सदर तक्रारीतील लेखी मजकुर तक्रारदार यांनी कथन केल्याप्रमाणेच असल्याची खात्री झाल्यानंतर आमच्या सुचने नुसार दोन्ही पंचानी सदर तक्रारीवर सह्या केल्या तक्रारदार यांनी अशा आशयाची तक्रार दिली की, अमळनेर शहरातील गणेश कॉलनी भागातील धनलक्ष्मी प्लॉझा येथील दुकान नंबर 2 हे त्यांचे भावाचे नावे असुन सदर दुकानाची सन 2018 -2019 या चालु वर्षिची एकुण 35940/- रुपये नगर परिषद कराची पावती क्रमांक 006146 अन्वयेची प्राप्त झाली होती. सदरची कर पावती जास्त रकमेची आकरलेली असल्याने तक्रारदार यांनी नगर परिषद अमळनेर येथे जावुन सदर बाबत अर्ज देवुन सदर कामाशी संबधीत लिपीक श्री सोमचंद छगन संदानशिव यांची सुमारे 15 दिवसापुर्वी भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना मी तुम्हाला दुकानावर येवुन भेटेल असे सांगितले होते. त्याप्रमाणे दि. 17/01/2019 रोजी सायंकाळी श्री सोमचंद संदानशिव हे तक्रारदार यांचे दुकानावर गेले व तक्रारदार यांना सांगितले की, तुमच्या दुकान नंबर 2 च्या कराची रक्कम 6 ते 7 हजार रुपये करुन देईल परंतु त्यासाठी तुम्ही मला 20000/-रुपये द्यावे लागतील असे सांगितले

होते. यावरुन श्री सोमचंद संदानशिव यांनी तक्रारदार यांना नगर परिषदेचा कर कमी करुन देण्याच्या मोबदल्यात तक्रार दाराकडुन 20000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे लक्षात आले . त्यानंतर दि. 18/01/2019 रोजी सायंकाळी श्री सोमचंद संदानशिव यांचे नगर परिषदेचे शिपाई श्री मनोज निंकुभ हे तक्रारदार यांचे दुकानावर आले व तुम्ही उद्या संदानशिव साहेबांना किमान 20000/- रुपये ऑफिस मध्ये नेवुन दिले तर तुमचा कर कमी होईल नाहीतर तुमच्या घर पट्टी मध्ये देखिल आम्ही वाढ करु असे सांगितले परंतु तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसुन श्री सोमचंद संदानशिव लिपीक व श्री मनोज निंकुभ शिपाई नगर परिषद अमळनेर यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करावी यासाठी तक्रार दिलेली आहे. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लगेच पडताळणी करण्याचे ठरले. तक्रारदार व पंच क्र. 1 यांना योग्य सुचना देवुन एक डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन सदर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बनियनच्या आत दोरीने लटकावुन दिले त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांच्या मोटार सायकलने नगर परिषद अमळनेर येथील श्री सोमचंद संदानशिव ,लिपीक व श्री मनोज निंकुभ ,शिपाई यांची भेट घेण्यासाठी नगर परिषद अमळनेर येथे रवाना केले. त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार व पंच क्र. 1 हे खाजगी वाहनाजवळ आले तेव्हा त्यांचे कडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले तेव्हा पंच क्र. 1 व तक्रारदार यांना विचारणा केली असता श्री सोमचंद संदानशिव ,लिपीक व श्री मनोज निंकुभ ,शिपाई यांची भेट न झाल्याने परत आल्याचे सांगितले तेव्हा आम्ही मार्गप्रतिक्षा करण्याचा निर्णय घेतला.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्र. 1 यांना पुन्हा योग्य सुचना देवुन एक डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बनियनच्या आत दोरीने लटकावुन दिले व तक्रारदार व पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांच्या मोटार सायकलने नगर परिषद अमळनेर येथील श्री सोमचंद संदानशिव लिपीक व श्री मनोज निंकुभ ,शिपाई यांची भेट घेण्यासाठी नगर परिषद अमळनेर येथे रवाना केले त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार व पंच हे आमच्या वाहनाजवळ परत आले .सदर वेळी पंच क्र. 1 व तक्रारदार यांनी सांगितलेली हकिगत व व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता श्री सोमचंद संदानशिव व श्री मनोज निकुभ यांनी तक्रारदार यांच्याकडे 12,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची खात्री झाली. सदरबाबत दि. 19/01/2018 रोजीचा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केली 12,000/- रुपये लाचेची रक्कम त्यात 2000/- रु दराच्या 02 व 500/- रुपये दराच्या 16 नोटांचे नंबर नोद करुन सदर नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली सदर बाबत सविस्तर सापळापुर्व पंचनामा करण्यात आला.त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांच्या अमळनेर शहरातील गणेश कॉलनी भागातील धनलक्ष्मी प्लॉझा येथील दुकान नं 2 येथे पाठवुन त्यानुसार सापळा लावण्यात आला. तक्रारदार यांनी श्री मनोज निंकुभ , शिपाई यांना फोन केला . त्यानंतर श्री निंकुभ हे तक्रारदार यांचे दुकानावर आले व पंचासमक्ष 12,000/- रुपयांची मागणी केली तेव्हा तक्रारदार यांनी श्री निंकुभ यांना लाचेची रक्कम दिल्यानंतर ठरल्याप्रमाणे इशारा केल्याने आम्ही व सापळा पथकातील अंमलदारांनी श्री निंकुभ यांना 21.40 वाजता जागीच पकडले तेव्हा श्री निंकुभ यांनी त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात सदर लाचेची रक्कम ठेवली असल्याचे पंच क्र. 1 यांनी सांगितले श्री निंकुभ यांना नाव गाव पत्ता विचारता त्यांनी आमले नाव मनोज साहेबराव निंकुभ वय 37 व्यवसाय नोकरी, शिपाई नगर परिषद अमळनेर ता अमळनेर रा गुरुकृपा कॉलनी अमळनेर ता अमळनेर जि जळगांव असे सांगितले त्यानंतर आम्ही श्री सोमचंद संदानशिव यांना नगर परिषद अमळनेर येथुन ताब्यात घेण्यासाठी पथक रवाना केले. त्यानंतर वर नमुद तवेराने आलोसे श्री मनोज निंकुभ यांना सोबत घेऊन अमळनेर पोलीस ठाण्यात गेलो व तेथे अल्ट्रा वॉयलेट दिव्याखाली प्रथम आलोसे श्री मनोज निंकुभ यांचे दोन्ही हात तपासले असता त्यांच्या दोन्ही हातांच्या बोटांच्या पेरांवर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली तसेच त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशाच्या मुखासही सदर चकाकी दिसुन आली शिवाय तक्रारदार यांच्या उजव्या हाताच्या बोटांच्या पेरांना आणी शर्टच्या डाव्या खिशाच्या मुखास सदर चकाकी दिसुन आली त्यानंतर काहीवेळाने वर नमुद पथकाने श्री सोमचंद संदानशिव यांना ताब्यात घेवुन अमळनेर पोलीस ठाण्या समोर हजर केले. आम्ही त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सोमचंद छगन संदानशिव वय 45 वर्षे व्यवसाय नोकरी, वरिष्ठ लिपीक नगर परिषद अमळनेर रा गांधलीपुरा अमळनेर ता अमळनेर जि जळगांव असे सांगितले सदर बाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा केला आहे.अशा प्रकारे आलोसे क्र. 1 सोमचंद छगन संदानशिव वय 45 व्यवसाय नोकरी, वरिष्ठ लिपीक नगर परिषद अमळनेर व आलोसे क्र. 2 मनोज साहेबराव निंकुभ वय 37 व्यवसाय नोकरी , शिपाई नगर परिषद अमळनेर यांनी त्यांना कायद्याने मिळणारे वेतन खेरीज करुन प्रवर्तक दान म्हणुन तक्रारदार यांचेकडुन तक्रारदार यांचे दुकानाचा नगर परिषदेचा कर कमी करुन देण्याच्या मोबदल्यात 12,000/- रुपये लाचेची मागणी केली. आलोसे क्र. 1 व 2 यांनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग करुन स्वतच्या आर्थिक फायद्याकरीता 12,000/- रुपये लाचेची रक्कम आलोसे क्र. 1 यांनी आलोसे क्र. 2 यांच्या मार्फतीने स्विकारली म्हणुन त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक (सुधारीत) कायदा सन 2018 चे कलम 7 प्रमाणे गुन्हा केल्याने माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** ~~Anil Digambar Badgujar~~(Inspector)) / PCMH84208 **or**
N.S. न्याहळदे, ACB जळगांव.

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
नाव ... प्रशांत ... 911806
हु. ... PN ... ब. ... 301
अमळनेर पोलीस स्टेशन

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाम): Anil Digambar Badgujar
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PCMH84208